माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- उमाशि-२०१५ /प्र.क्र.२६२ / एस.डी.२**
**मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक :- २५ जानेवारी, २०१९.**

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र.उमाशि-२०१५ /प्र.क्र.२६२ / एस.डी.२,दि.२० डिसेंबर,२०१८.

**शुध्दीपत्रक :-**

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परिक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे वाढीव गुण देण्यासंदर्भातील सुधारीत नियमावली प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर नियमावलीतील परिशिष्ट ६ व ७ अन्वये सवलतीच्या गुणांबाबत नमूद करण्यात आले आहे. या गुणांकनाबाबत शासनाकडे काही निवेदने प्राप्त झाली आहेत. सदर निवदने विचारात घेऊन संदर्भाधीन शासन निर्णयामधील परिशिष्ट ६ व ७ येथील सवलतीच्या गुणांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. संदर्भाधीन शासन निर्णय दि.२० डिसेंबर, २०१८ मधील परिशिष्ट ६ व परिशिष्ट ७ वगळून याव्दारे,सुधारित गुणांबाबतचे सोबतचे परिशिष्ट ६ व परिशिष्ट ७ समाविष्ट करण्यात येत आहे.

३. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक *२०१९०१२५१५४८४९४५२१* असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suvarna Siddharth Kharat

Digitally signed by Suvarna Siddharth Kharat
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=065279b98828b1456ad0d62a97fa45eee948af8abe5a27104d4e132c5bd1d93a, cn=Suvarna Siddharth Kharat
Date: 2019.01.25 17:48:12 +05'30'

**( डॉ.सुवर्णा सि.खरात)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा,विधानभवन, मुंबई
२) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
३) सर्व सदस्य महाराष्ट्र विधानसभा / विधानपरिषद, विधानभवन, मुंबई

४) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
५) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
७) मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) मा.आयुक्त (क्रिडा), महाराष्ट्र राज्य, पुणे
९) सह संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ, पुणे.
१२) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ (सर्व).
१३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१४) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
१५) सर्व गटशिक्षणाधिकारी
१६) सर्व शिक्षण निरीक्षक, मुंबई (पूर्व ,पश्चिम, उत्तर)
१७) सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक
१८) निवड नस्ती (एसडी - २)

**शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२**
**दिनांक :- २५ जानेवारी, २०१९ सोबतचे**

## *सुधारित परिशिष्ट -६*

[माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना वाढीव क्रीडागुण सवलतीचा अनुज्ञेय तक्ता.]

| स्पर्धेचा स्तर | क्रीडा स्पर्धांचे प्रकार व आयोजक . | क्रीडा सवलतीचे अनुज्ञेय गुण | |
|---|---|---|---|
| | | प्राविण्य (प्रथम ते तृतीय क्रमांक पर्यत) | इतर सर्व सहभागी खेळाडू |
| जिल्हास्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा आयोजीत विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धा, “पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया” मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा, स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | ०५ | ०० |
| विभागस्तर | क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा आयोजीत विभागीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या विभागीय क्रीडा स्पर्धा, “पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया” मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा आणि स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा. | १० | ०५ |
| राज्यस्तर | १)क्रीडा व युवक सेवा संचालनालयाद्वारा आयोजीत राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा, नेहरु हॉकी कप, सुब्रोतो मुखर्जी फुटबॉल क्रीडा स्पर्धा व केंद्र शासनाच्या क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेळ प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा, “पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया” मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा, स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | १५ | १० अथवा १२<br><br>(जिल्हास्तरावरून थेट राज्यस्तरावर सहभाग असल्यास १० गुण)<br>(विभागस्तरावरून राज्यस्तरावर सहभाग असल्यास १२ गुण) |
| | २)महाराष्ट्र शासनाच्या अपंग कल्याण विभागाद्वारा आयोजीत राज्यस्तर अपंग क्रीडा स्पर्धा. | | |
| | ३)महाराष्ट्र शासनाच्या अदिवासी विकास विभागाद्वारा आयोजीत राज्यस्तर आदिवासी क्रीडा स्पर्धा. | | |
| | ४) एकविध खेळांच्या राज्य संघटनेद्वारा आयोजीत राज्य अजिंक्यपद स्पर्धा. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रीयस्तर | १)भारतीय शालेय खेळ महासंघाद्वारा आयोजीत राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा.<br>२)केंद्र शासनाचा क्रीडा व कल्याण विभागाच्या भारतीय खेल प्राधिकरणाने पुरस्कृत केलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>३)सुब्रतो मुखर्जी स्पोर्ट्स एज्युकेशन सोसायटी व जवाहरलाल नेहरु हॉकी टूर्नामेंट सोसायटी द्वारा आयोजित सदर खेळांच्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा.<br>४) अधिकृत एकविध खेळांच्या राष्ट्रीय फेडरेशनद्वारा आयोजीत राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा.<br>५) "पॅरालिंपिक्स कमिटी ऑफ इंडीया" मार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धा.<br>६) स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया मार्फत आयोजित स्पर्धा तसेच स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडीया यांच्याशी संलग्न खाजगी असोसिएशन मार्फत आयोजित स्पर्धा. | २० | १५ |
| आंतरराष्ट्रीय | १) आलिंपिक,एशियन गेम्स व कॉमनवेल्थ गेम्स. | २५ | २० |
| | २)अधिकृत एकविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनद्वारा आयोजीत केलेल्या आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा. | २५ | २० |
| | ३)आंतरराष्ट्रीय शालेय महासंघाद्वारा आयोजीत आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा | २० | १५ |

टिप :- १) वरील नमूद एकविध खेळ संघटनाद्वारा आयोजित क्रीडा स्पर्धा या अधिकृत वार्षिक अजिंक्यपद स्पर्धा असणे आवश्यक आहे. अन्य अथवा निमंत्रित स्पर्धांना क्रीडागुण सवलत अनुज्ञेय राहणार नाही.

२) राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंपैकी जे खेळाडू जिल्हास्तरीय स्पर्धांनंतर विभागस्तरीय स्पर्धांमधून निवड होऊन राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होतील, त्यांना क्रिडा सवलतीचे १२ गुण अनुज्ञेय राहतील. जे खेळाडू जिल्हास्तरीय स्पर्धेनंतर थेट राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी होतील, त्यांना क्रिडा सवलतीचे १० गुण अनुज्ञेय राहतील.

**********************

शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२
दिनांक :- २५ जानेवारी, २०१९ सोबतचे

# *सुधारित परिशिष्ट -७*

[माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) किंवा उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या एन.सी.सी.चे छात्र तसेच स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांना वाढीव गुण सवलतीचा अनुज्ञेय तक्ता.]

| विभाग | शिबीरे/संचलनाचा प्रकार | सवलतीचे अनुज्ञेय गुण |
|---|---|---|
| एन.सी.सी | १) बेसिक लिडरशिप कॅंप (बी.एल.सी) | ०३ गुण |
| | २) पूर्व प्रजासत्ताक दिन शिबिर (प्री आर.डी.कॅंप) | ०५ गुण |
| | ३) प्रजासत्ताक दिन संचलन राष्ट्रीयस्तर शिबीर/संलग्न स्पर्धा सहभाग | १० गुण |
| | ४) प्रजासत्ताक दिन राष्ट्रीय शिबीर /संलग्न स्पर्धा पदक विजेते | १५ गुण |
| | ५) आंतरराष्ट्रीय युथ एक्सचेंज प्रोग्रॅम सहभाग. | २० गुण |
| स्काऊट व गाईड | १) राज्यपाल पदक प्राप्त विद्यार्थी | ०३ गुण |
| | २) राष्ट्रपती पदक अथवा आंतरराष्ट्रीय जांबोरी शिबीर सहभाग. | १० गुण |

**********************